**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.०५)**

**रविवार दिनांक १० मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **तमिळनाडूचे मुख्यमंत्री म्हणून तमिळगा वेत्री कळ्ळगमचे सी.जोसेफ विजय यांनी घेतली शपथ.**
2. **जलसंधारण ही जनचळवळ बनणे गरजेचं असल्याचं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन; १७ आणि १८ मे रोजी नागपुरात 'जलसंवाद' आणि 'जलक्रांती परिषदेचं आयोजन.**
3. **अशोक खरात प्रकरणी, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची विशेष तपास पथकाकडून चौकशी.**
4. **मार्च महिन्यापासून राज्यभरात उष्माघाताच्या २२९ रुग्णांची नोंद; दोघांचा मृत्यू झाल्याची आरोग्य विभागाची माहिती.**

**आता सविस्तर बातम्या .......**

तामिळनाडू मुख्यमंत्री

तामिळनाडूमध्ये तामिळगा वेत्री कळघम, या पक्षाचे संस्थापक सी. जोसेफ विजय यांनी आज सकाळी तामिळनाडूच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. राज्यपाल राजेंद्र अर्लेकर यांनी त्यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली. विजय यांच्याबरोबर नऊ मंत्र्यांनीही शपथ घेतली. विजय यांनी काँग्रेस, CPI, CPIM, VCK आणि IUML यांच्या पाठिंब्यासह, २३४ सदस्यांच्या सभागृहात १२० आमदारांचा पाठिंबा मिळवला आहे. लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि तामिळ चित्रपटसृष्टीतले अनेक मान्यवर या शपथविधी सोहळ्याला उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे तसंच इतर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी आणि सर्वपक्षीय नेत्यांनी विजय यांना शुभेच्छा दिल्या आहेत. श्रीलंकेचे अध्यक्ष अनुरा कुमार दिसानायके यांनीही विजय यांचं अभिनंदन केलं आहे. टीव्हीकेने येत्या बुधवारी १३ मे रोजी विधानसभेत बहुमत सिद्ध करावं असं राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांनी सांगितलं आहे.

आसाम मुख्यमंत्री

आसाम विधानसभेत भाजपप्रणितराष्ट्रीय लोकशाही आघाडीचे विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून हिमंता बिस्वा सरमा यांचीनिवड करण्यात आली. त्यामुळे आता सलग दुसऱ्यांदा सरमा यांचा मुख्यमंत्री बनण्याचामार्ग मोकळा झाला आहे. सरकार स्थापनेसंबंधीच्या बाबींवर चर्चा करण्यासाठी राज्यपाललक्ष्मण प्रसाद आचार्य यांची ते भेट घेणार आहेत. नवीन मंत्रिमंडळाचा शपथविधीयेत्या मंगळवारी १२ मे रोजी होणार आहे.

पूर्ती सिंचन /गडकरी

विदर्भाला शेतकरी आत्महत्या मुक्त करण्यासाठी तसेच इथल्या गावांना जलसमृद्ध करण्यासाठी जलसंधारण ही जनचळवळ बनणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले .विदर्भात जलसंधारणाचे काम करणाऱ्या पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी प्रसंगी नागपूर मध्ये 17 आणि 18 मे रोजी जलसंवाद आणि जलक्रांती परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे या संदर्भात माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत गडकरी बोलत होते. याप्रसंगी काटोलचे आमदार चरणसिंग ठाकूर वरुड मोर्शीचे आमदार उमेश यावलकर उपस्थित होते. दिनांक १७ मे रोजी दुपारी ४:०० वाजता सिव्हिल लाईन्स येथील डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात 'नागपूर जलसंवाद या राष्ट्रीय परिषदेत ‘शेतकरी आत्महत्यामुक्त विदर्भासाठी जलसंधारण एक उपाय’ या विषयावर मंथन केल जाणार आहे. तर १८ मे रोजी सकाळी १०:०० वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित 'जलक्रांती परिषदेत संस्थेच्या २५ वर्षांच्या प्रवासाचा आढावा घेतला जाणार असून, विदर्भातील 'तामसवाडा पॅटर्न' सारख्या यशस्वी जलसंधारण प्रयोगांवर चर्चा होईल. या परिषदेला 'पाणी फाउंडेशन'चे संस्थापक आमीर खान, 'नाम फाउंडेशन'चे अध्यक्ष नाना पाटेकर, आणि सचिव मकरंद अनासपुरे यांची प्रमुख उपस्थित राहणार आहेत. या रौप्य महोत्सवी सोहळ्याच्या निमित्ताने 'जलपर्व', 'जलक्रांती', 'कृषिकल्याण' आणि 'कॉरिडॉर्स ऑफ वॉटर सिक्योरिटी' या महत्त्वपूर्ण पुस्तकांचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते केलं जाईल.

गडकरी पुरस्कार

नेतृत्व आणि राष्ट्र उभारणीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल, केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांना स्वर्गीय भाऊसाहेब चंद्रायण स्मृती

पुरस्कार २०२५' देऊन गौरविण्यात आल. सेंटर फॉर डेव्हलपमेंट रिसर्च, नागपूर यांच्या वतीने नागपुरातील चिटनवीस सेंटर येथील बनयान हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात भारताचे माजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विकास सिरपूरकर यांच्या हस्ते हा प्रतिष्ठित पुरस्कार प्रदान करण्यात आला. संशोधन, वकिली आणि विकास या माध्यमांतून सार्वजनिक जीवनाला नवी दिशा देणाऱ्या व्यक्तिमत्वांचा सन्मान करण्यासाठी हा पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. भारताच्या पायाभूत सुविधांमध्ये क्रांती घडवून आणण्यातील गौरवशाली भूमिका आणि लोककल्याणाप्रती असलेल्या त्यांच्या समर्पणासाठी गडकरी यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. याच कार्यक्रमात डॉ.कपिल चांद्रायण लिखित ‘सामान्यातील असामान्य भाऊसाहेब’ या पुस्तकाच प्रकाशन करण्यात आल.

बंद

AIOCD अर्थात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री तसेच कार्पोरेटद्वारे अव्यावसायिक स्पर्धे विरोधात २० मे रोजी, औषध विक्रेत्यांचा बंद पुकारला आहे. केंद्र सरकारने इंटरनेटच्या माध्यमातून ऑनलाईन औषधं विक्रीबाबत सूचना जारी केली होती. परंतु, त्याचे अद्याप कायद्यात रुपांतर झालेले नसतानाही देशभरात सर्रासपणे ऑनलाईन औषध विक्री सुरु आहे. याबाबत दिल्ली उच्च न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगितीसुध्दा दिलेली आहे. या संदर्भात सरकारनं देखील ऑनलाईन औषध विक्रीवर प्रतिबंध आणण्याची मागणी संघटनेने केली आहे.

भोंदू अशोक खरात

लैंगिक अत्याचार प्रकरणी अटकेत असलेल्या अशोक खरात प्रकरणी, राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्ष रुपाली चाकणकर यांची आज नाशिक मध्ये विशेष तपास पथकानं चौकशी केली. यावेळी रुपाली चाकणकर आणि खरात यांचे आर्थिक संबंध, खासगी पतसंस्थांमधली खाती, खरात याच्या धार्मिक संस्थेमधलं चाकणकर यांचं सदस्यत्व, या आणि इतर मुद्द्यांवर विशेष तपास पथकानं चौकशी केली.

मराठी सक्ती

राज्यातील इंग्रजी, हिंदी, उर्दू, तमिळसह सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी पाठ्यपुस्तक अनिवार्य करण्यात आले आहे. यासंदर्भात महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक

निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ अर्थात बालभारतीने परिपत्रक जारी केले असून, नवीन शैक्षणिक वर्षापासून सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये मराठीचे धडे शिकविण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गोडी लागावी, मराठीचे ज्ञान वाढावे तसेच स्थानिक संस्कृती आणि परंपरेची ओळख व्हावी, या उद्देशाने शासनाने हा निर्णय घेतल्याचे सांगितले जात आहे.

रेल्वे भरती

रेल्वे भरती मंडळामार्फत सहाय्यक लोको पायलट पदांसाठी ११ हजार १२७ जागांची मेगा भरती जाहीर करण्यात आली आहे. रेल्वे मंत्रालयाने या भरती प्रक्रियेला मंजुरी दिली असून, देशभरातील १७ रेल्वे झोनमध्ये ही भरती होणार आहे. या भरतीसाठी ऑनलाइन अर्ज प्रक्रिया १५ मे पासून सुरू होणार असून उमेदवारांना १४ जून पर्यंत अर्ज करता येणार आहे.

उष्माघात रुग्ण

राज्यात वाढत्या तापमानाचा नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, गेल्या दोन महिन्यांत उष्माघाताच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. १ मार्च ते 9 मे या कालावधीत राज्यभरात उष्माघाताचे २२९ रुग्ण आढळले असून, त्यापैकी दोघांचा मृत्यू झाल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली आहे. याशिवाय आणखी तीन संशयित मृत्यूंची नोंद करण्यात आली आहे. यंदा राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने वारंवार ४० ते ४५ अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला आहे. सर्वाधिक ७९ रुग्णांची नोंद छत्रपती संभाजीनगर येथे झाली आहे. त्यानंतर नंदुरबार जिल्ह्यात २९ रुग्ण आढळले आहेत. अमरावती येथे १२, बुलढाणा येथे ११, तर गडचिरोली येथे ८ रुग्णांची नोंद झाली आहे. तीव्र उष्णतेमुळे बाहेर काम करणारे मजूर, डिलिव्हरी आणि मार्केटिंग कर्मचारी, वाहतूक पोलिस, रस्ते कामगार तसेच दीर्घकालीन आजार असलेल्या व्यक्तींनी विशेष काळजी घेणे आवश्यक असल्याचं मत तज्ञानी व्यक्त केलं आहे.

हवामान

हवामान - अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर या सर्व जिल्ह्यांत आज मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह वादळ घेण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. उद्या देखील बुलढाणा, अकोला आणि अमरावती

इथं वादळाची स्थिती कायम राहण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान खात्यानं वर्तविला आहे.

मान्सून

अंदमान मध्ये यंदा मोसमी पावसाचं आगमन वेळेच्या आधी होण्याची शक्यता खाजगी हवामानशास्त्र संस्था स्कायमेटनं वर्तवली आहे. येत्या १२ आणि १३ मे ला विषवृत्तीय प्रदेशाजवळ बंगालच्या उपसागरात कमी दाबाचं क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असून त्यामुळे मोसमी पाऊस नेहमीपेक्षा लवकर येणार असल्ल्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

मुष्टियुद्ध स्पर्धा

ताश्कंद इथं सुरू असलेल्या आशियाई १५ वर्षांखालील आणि १७ वर्षांखालील मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत नऊ भारतीय महिला मुष्टीयोद्ध्यांनी धडक मारली आहे. १५ वर्षांखालील गटात, ३०-३३ किलो वजनी गटात भारताच्या अक्षिताने कझाकस्तानच्या अयाझान मारातवर एकतर्फी विजय मिळवला. तर ३७, ४०, ४३, ४६ आणि ५८, ६१ आणि ६४ किलो वजनी गटात भारतीय महिला मुष्टीयोद्ध्यांनी विजय संपादन केला.

आयपीएल

आयपीएल स्पर्धेत आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि मुंबई इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. छत्तीसगडमधे रायपूर इथं शहीद वीर सिंग आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

*****